|| भोर परगणा रणधुरंधर स्वराज्यासेवेसी निरंतर||

भोर तालुक्यातील (जि. पुणे. महाराष्ट्र) इतिहास प्रसिद्ध हिरडस मावळातील बांदल देशमुख आणि त्यांच्या सेनेचा अतुलनीय पराक्रम जो फक्त पावनखिंडीपुरता मर्यादित नसून स्वराज्याच्या महत्वाच्या व निर्णायक युद्धांमध्ये या बांदल सेनेने गाजवलेला पराक्रम आणि त्यांच्या बद्दलच्या सत्य असत्य गोष्टी यांचा instagram वरील @historic_bhor या page वर insta live च्या माध्यमातून अभ्यासपूर्ण मागोवा घेण्याच्या उद्देशाने प्रसारित करण्यात आलेल्या कार्यक्रमासाठी अभ्यासलेले काही संदर्भ, मुद्दे यांचा हा संग्रह पुढे दिला आहे.

संकलन :-

संकेत मोरे वैभव बांदल

भोर. जि. पुणे, ४१२२०६.





“भूपा हिर्दसो भ्धुतः प्रभुत भिजन प्रियाः ॥

मज्जैत्र यत्राः कुवर्णाः प्रोल्लो सन्ति पदे पदे ॥”

अर्थ- “हिरडस मावळामधे लोकप्रिय असणारे राजेबांदल माझी विजय यात्रा यशस्वी करत,प्रत्येक पावलाला माझ्या सैन्याचा उत्साह वाढवीत आहेत.” बांदलांच वरिल वर्णन दस्तुरखुद्द शंभुछत्रपतींनी केलाय...

हुमजाईमाता :- बांदलांची कुलदेवी





बांदल घराण्याची वंशावळ

कृष्णाजी बांदल देशमुख
पत्नी दीपाऊ

↓

बाजी बीन कृष्णाजी बांदल देशमुख

↓

रायाजी बीन बाजी बांदल देशमुख
दोन पत्नी

↓


- शंकराजी
- मानसिंग (मानाजी)
- चांदाजी (चांदजी)
- बाजी
- संताजी

सध्या बांदलांचा वंश हिरडस मावळातील मुख्यत्वे महडे, पिसावरे, आळन्दे, इंगवली व संगमनेर या गावांमध्ये स्थायिक झाला आहे. ता. भोर जि. पुणे . ४१२२०६

मूळपुरुष- कृष्णाजी नाईक बांदल देशमुख



- हिरडस मावळाचे देशमुख
- जावळीतून हिरडस मावळात देशमुखी
- सन 1625 मधे बांदलांनी निजामाचा वजिर मलिक अंबरास हरवुन केंजळगड जिंकला
- बारामावळातील मातब्बर व्यक्तिमत्व
- ५३ गाव जहागिरी
- दादोजी कोंडदेव सोबत कलह
- १६३६ ला कोंढाणा किल्ल्यावर मसलतीस बोलवून दगाफटका आणि मृत्यू



बांदल घराण्याची तकरीर

युद्ध तीन रोज जाले शेवट चंद्ररायाची लढाई मोडिली त्याचा विचार दिपाई आऊ व त्यांजकडील सरणोबत बोलाऊन मेळा आणि विचार पुसो लागली की ही मोहि केली करावी म्हणऊन विचारिले त्यावरून दिपाई आऊ व सरणो [बत*] यांनी आर्ज केला की आम्ही जिवंत आसतां विचार दुसरा नाही चंद्रराव धरून आणितो साहेबीही आपले नजरेनें पाहावे युद्ध समयी कोणकोण साहेबकाम करिता [त*] ते पाहावें ऐसा अर्ज केला तेव्हां माहाराजांनी धारेचे पान देऊन युद्धावरी रवाना केले युद्ध जाहले चंद्रराव धरून आणिला आणि माहाराजा गनीम उभे केले त्याउपरी माहाराज मेहर्वान दिपाई आऊ व सरणोबतावरी जाले जे धकत केली ते येकनिष्ठपणे केली ते कळो आली माहाराज तुमचे उर्जीत करितील येथून गेलियावरी तुम्हांस सनदा देऊ ऐसे अभयवचन दिल्हें जावळीची बंदोबस्ती करणे कराजी आददराऊ देशपांडे ता॥ पोवळोरे यांबरोबर हजार माणुस ठेविले त्यांमध्यें आपले लोकही होते बंदोबस्ती करून मुळुकगिरीस विचारून सुभेदार करून ठेविला मग राज्याची एकी करणे स्वारी जाली त्यास बहुत दिवस जाले मग मातुश्री दिपाई आऊ व सरणोबत यांणी आर्ज केला की अभये-वचन दिल्हे त्याचा मार्ग लक्षीत आसो म्हणऊन अर्ज केला त्यावरून कृपाळु होऊन सनदा दिल्या त्याची नकल बीतपसील.

(६) आज रफखाने राजश्री सिवाजी राजे दाम दौलतहू बजानेबू कारकुनानी हल इस्तकबाल ता॥ हिरडस मावळ विद्यानंद सु॥ इहिदे खमसेन अलफ बाजी नाईक बांदल देशमुख ता॥ मजकूर गजहलियामध्यें आपले जमितीनेसी साहेबाचें मसलतीस येऊन येकतारी केली त्यावरून देशमुखावरी मह्रवान होऊन इनाम अजरामऱ्हामती मौजे भागवदरे देह १ येक देखील बहितवाती महसुली व बाजे बाबा व कुलबाब इनाम दिल्हे असे याचे दुमाला करणे अवलाद-अफलाद चालवणे दर द(ह)रसाल ताजे खुर्द खाका(ता)ची उजूर न करणे तुम्ही ताळीक घेऊनें असल खुर्दखताची देशमुखापासी फिरोन देणें सदरहू देह रकम महसूल टके ९३१६ बाजे बाब टके १९॥ यकूण टके ११२॥ ६ देकसे बारा टके बेतालीस रुके यासी दिल्हे असे दुमाला करणे.

माज प्रो पन्हर खुर्द

येणेप्रो वतनी सनदा दिल्या त्याउपरी कांही दिवस जाले तो मागती अबदुलखान अला त्यास माहाराजांनी मतीजा दिल्हा हे समयी सेवा महाराजांनी घेतली त्याउपरी शास्तखान पुण्यास आला त्यासीही माहाराजांनी मतीजा दिल्हा तेव्हांही सेवा घेतली पुढे माहाराज किले विशाळगडास गेले त्याबरोबर आपले आजे रायाजी नाईक बांदल व बाजी प्रभू देशपांडे सरनोबत व लोक होते त्यास किले विशाळगडास नामजाद होऊन किले पनालियास वेढ्यीकारणे गेले तो सिधी जोर विजापुराहून फौजनसी अला माहाराज विशाळगडास आले मागे गलीम आला तो महिना भाद्रपद मास वद्य चतोर्थी ते दिवशी आला माहाराजानी कुळ जमाव उतरिला तेव्हा रायाजी नाईक यासि

बोलाविले आणि हुकूम फरमाविला जे तुम्हीं व सरनोबत व लोक घेऊन घुडाऊ खाणे गनीम जोरावर राहता नये म्हणऊन हुकूम केला त्यास बाजी परभू सरनोबत यांही अर्ज केला की रायाजी नाईक नेणते आहेत संततही जाली नाही आम्ही व लोक साहेबकामावरी आलों या उपरी निदान अले मागे कबिले आहेत त्यांचें व रायाजी नाईक नेणता आहे याचे उर्जीत करणार माहाराज धणी आहेत म्हणऊन रायाजी नाईक यासि हाती देऊन पायावरी डोई ठेऊन जमाव सुद्धा घाटाखाली उतरले युद्ध तुंबळ जाले गनीम (७) मारून काढिला ते समई बाजी परभू व लोक साहेबकामावरी पडिले हे वर्तमान माहाराजांनी आपले नद्रनें पाहिले ऐसे वर्तमान जाले तेव्हा रायाजी नाईक यांणी अर्ज केला की बाजी परभू सरनोबत व लोक पडिले त्यास दिल्हे लावावयासि याचे लागते त्याचा हुकूम क.ये तेव्हां माहाराजानी भले लोक बरोबर देऊन रायाजी नाईक यासि पाठविले मागे बहुत खेद केला तो लिहितां पुरेत नाही रायाजी नाईक यांणी बाजी परभूस व लोकांस दिल्हेस लाऊन आले माहाराजाच्या पायावरी डोई ठेविली आणि अर्ज केला जे माझे लोक व सरनोबत होता तो ये समई साहेबकामावर खर्च जाले तैसेच जागोजागा लोक खर्च जाले याउपरी आपला नेणतपणा मोहरे आपली गती कैसी होईल म्हणोन खेद मापून उभे राहिले ते समई माहाराज [मो. जा.*] स्वामी यांनी मस्तकी हात ठेविला जे साहेबा देखतां काजेकामें केली त्याओं तुमचे वंशपरंपरेने चालविने व जे लोक पडले त्यांचेही चालविणे दिलगीर न होणे म्हणऊन हस्त ठेऊन उठविले आपल्या डेरियास जाणे मग रायाजी नाईक विशाळगडी मुकाम होता तोपर्यंत तेथेंच राहिले माहाराजास मागते फिरोन येतेवेळेस मुकाम चसवे पिंद ता॥ हिरडस मावळ येथे जाला तेव्हा मातुश्री दिपाई आवा यासी बोलाऊन आणून बहुत प्रकारे समाधान करू लागले तेव्हा दिपाई आऊ यानी पायावर डोई ठेऊन अर्ज केला की माझे लोक व बाजी परभू देशपांडे सरनोबत होते ते अवघेही लोक साहेबकामावरी खर्च जाले पदरीचे मांडवस सरले तरी साहेबीं त्यांचे घरचे समाधान करावें व रायाजी नेणता आहे याचे वंशपरंपरेने चालवावें म्हणजे आम्हास सर्व पावले आपले विशिष्ट पुर्वीचे अभये दिल्हे आहे ते माहाराज चालवितील म्हणऊन अर्ज केला त्याउपरी साहेबी मेहरबान होऊन हाती धरून उठविली आणि अभयवचन दिल्हे की तुझा बाजी परभू देशपांडे सरनोबत व लोक पडिले त्यांचे समाधान करणे साहेबास आहे त्यांच्या घरास जाणे लागते तुम्ही फिकीर न करणे त्यावरून मातुश्री दिपाई आऊ यांनी वचन मान्य केले मग साहेब बाजी परभूच्या घरास गेले त्याचे घरचे बायेका व लेक व भाऊबंद यांचे समाधान केले त्याप्रो त्यांचेही साहेब चालवीत आले आहेत वेंगियावरी माहाराज राजगडास गेले तो कितेका दिवसी मिरजा राजा किले पुरंधराखाली आले तेथे युद्ध जाले ते समयी मुरारबाजी परभू व भले लोक (८)

कितीक पडले गनीम जोरावर ते समई तह जाला सत्तावीस किले देऊन महाराज साहेब यानी दिपाई आऊस महाराज मातुश्री साहेबाजवळ ठेविली आणि आपण व मिरजा राजा समागमे दिल्लीस गेले ते वर्तमान तपसीलवार लिहितां पुरत नाही माहाराज बखर्शीत होऊन दिल्लीहून स्वराज्यास आले मातुश्री साहेबाचे दर्शन जाले ते समई दिपाऊई आऊ यानी पायावरी डोई ठेविली तेव्हां मातोश्री साहेबी दिपाई आऊचे सेवेचे वर्तमान सांगितले की दिपाईनें येकनिष्ठपणे या विचारांत सेवा केली तरी तुम्ही यांचे वंशपरंपरेने चालऊन सेवा घेत जाणे म्हणऊन हाती दिल्ही माहाराजांनी बहुत संतोष मानून मातुश्री साहेबाचे वचन मान्यें केले त्याउपरी राज्याची वृद्धी बहुत जाली माहाराजास किले रायेगडास आले त्यास दादाजी यशवंतराव मोरे शिवतरकर यांनी हरामखोरी केली त्यास नतीजा दिल्हा म्हणऊन दहशत माहालोमाहाली पडली यामुळे रायाजी नाईक याचा नेणतपणा कोणी विचार सोसावयास नाहीं दिपाई आऊ यांनी सांगावे तरी हुजूर मातोश्री साहेबाजवळ हमेशा राहिली होती त्यास न कळत कबिला घेऊन मौजे चिखली नजीक देऊळघाट येथे गेले ते पांच वर्षे होते त्याउपरी माहाराजांनी कौल देऊन वतनावरी आणिले कौलाची ताळीक बीतपसील.

श्री माहादेव

मातुश्री आईसाहेब

कौलनामा अज रफखाना राजश्री सिवाजी राजे साहेब दाम दौलतहू ता॥ मावळे [रायाजी बांदल देशमुख ता॥ हिरडस मावळ सुहुर सन इसने सबैन व अलफ दाये कौलनामा ऐसाजे दादाजी येसवंतराव शिवतरकर यानी हरामखोरी केली माबदल त्यास धरून दस्त केले त्यावरून तुम्ही शंका धरून बाहेर गेलेस ऐसियास हाली तुमचे याबे राजश्री रंगाजी राजे निंबाळकर यानी लिहिले की रायाजी बांदल यासी कौल देऊन वतनावर नेले पाहिजे म्हणऊन उत्तर तुम्हास कौल मरहमत केला असे कोणे बाबे शक आंदिशा न करिता तुम्ही वतनावरी येणे आणि आपले देशमुखीचा कारभार करणे (९) तुमच्या विचारा खता होणार नाहीं व देशमुखी पिढी दर पिढी चालऊन हे याबे श्री-देवाची आण व मातुश्री-साहेबाची आण असे व भाक माळ पाठविली असे घेऊन कबीहाल होऊन येऊन सुखे असणे कौल असे याउपरी अभये कौल घेऊन वतनावरी रायाजी नाईक आणिले वतनावरी स्थापन केली मागती हुजूर दर्शनास बोलाविले तेव्हा रायाजी नाईक हुजूर दर्शनास गेले दिपाई आऊची भेट झाली उभयेता मिळून महाराजाच्या दर्शनास गेले पायावर घातला आहे हा नेणता आहे साहेब मेहरबान जाले पाहिजे त्या उपर माहाराज कृपाळु होऊन उठविले आणि आज्ञा केली की सुखरूप राहाणे आजपासून हुजूर असणे वतनाचा कारभार येथून करणे ऐसे वर्तमान जाले त्याउपरी माहाराज कितीका दिवशी चंदीस मसलतीस जाऊ लागले तेव्हां रायाजी

तकरीर म्हणजे काय ?

मध्ययुगीन महाराष्ट्रात न्यायनिवाडा हा गोतसभेने होत असे. तेव्हा दोन्ही पक्ष आपापली बाजू मांडण्यासाठी लेखी अर्ज लिहून घेतला जात असे. त्यास "तकरीर" असे म्हणतात. तत्कालीन निवाड्यामध्ये अशा तकरिरी सादर केल्या जात असत.

सदर बांदलांची तकरीर ही छत्रपती संभाजीमहाराज पुत्र शाहूमहाराज (सातारा गादी) कालीन आहे. (इ.स. १७१४ नंतर)

या तकरीरीची फुलस्केप वही (देवनागरी लिपीमध्ये लिप्यंतर केलेली) पुण्यात स्थायिक झालेले वकील श्री, के. व्ही. बांदल (मूळ गाव – आळन्दे, ता.भोर) यांच्याकडे सापडली. प्रारंभिक माहिती गहाळ आहे. त्यांनी ती भारत इतिहास संशोधन मंडळात आणून दिली. प्रा. ग. ह. खरे आणि श्री. ना. के. जोशी यांनी तिचा पाठ ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड १० पृ. करा. १ ते १३ मध्ये

" बांदल घराण्याची एक तकरीर " या नावाने छापला आहे.

ही तकरीर लिहिणारा लेखक " रायाजी बांदल " हे आपले आजे असल्याचे नमूद करतो.

तसेच " मानाजी बांदल " हा आपला चुलता असल्याचे नमूद करतो.


❖ मूळ तकरीर लेखकाकडून काही ठिकाणी तपशील देताना चुका झाल्या आहेत, त्यावर संशोधन होऊ शकते

अधिक माहिती साठी दिलेली तकरीर व गजानन भास्कर मेहेंदळे लिखित " श्री राजाशिवछत्रपती" भाग २ परिशिष्ट २७ " बांदलांची तकरीर " पृ. क्र. ८८९ ते ८९५ पहावे.

बांदल देशमुख आणि देशपांडे संबंध

हिरडस मावळचे देशमुखी वतन बांदल घराण्याकडे तर कुलकर्णी वतन देशपांडे घराण्याकडे होते. ही दोन्हीही घराणी विजापुरच्या अदिलशहाचे सेवक होते. दोघांचाही कारभार स्वतंत्र पण एकमेकास पूरक होता. कृष्णाजीराजे नाईक बांदल देशमुख यांच्याहातून एका लढाईमध्ये बाजीप्रभू देशपांडे यांचे वडील मारले गेले. पुढे इ. स. १६३० च्या सुमारास जेधे देशमुख विरुध्द बांदल देशमुख यांचे कासारखिंड येथे युद्ध झाले. (एकूण ७ युद्धे) तेव्हा युद्ध हरल्यास हिरडस मावळचे वतन जेधेंकडे जाऊ नये म्हणून बाजीप्रभू व फुलाजीप्रभू देशपांडे यांनी कृष्णाजी नाईक बांदल देशमुखांना लष्करी मदत केली. या युद्धात बांदल देशमुखांची सरशी झाली. पुढे बांदल –देशपांडे संबंध दृढ होत गेला.

दिपाऊ बांदल - आऊसाहेब



- फलटणच्या निंबाळकर घराण्याची कन्या
- कृष्णाजी नाईक बांदल देशमुखांच्या पत्नि.
- "छत्रपती शिवरायांची प्रथम पत्नी, युवराज संभाजी महाराजांच्या मातोश्री सईबाईसाहेब राणीसरकार यांच्या दिपाऊ बांदल ह्या आत्या होतं"
- कृष्णाजींच्या मृत्युनंतर त्यांच्या पत्नी दिपाऊ व पुत्र बाजी बांदल आपल्या बांदल सेनेसमावेत स्वराज्यास सामिल झाले
- अनेक न्यायनिवाड्यांच्या गोत सभेत न्यायाधीश म्हणून हजर उदा. वेळवंड खोऱ्याच्या धुमाळ देशमुखांच्या वाटणीचा वाद
- मिर्झाराजा जयसिंग जेव्हा स्वराज्यावर चालून आला, तेव्हा नाइलाजास्तव त्याच्यासोबत तह करणे शिवाजी राजांना भाग पडले., आणि याचं तहाच्या कलमानुसार राजे आणि बाळ शंभू राजांना आग्र्यास बादशहाच्या भेटिस जावे लागले, मोघल दरबारी असणाऱ्या रिवाजाप्रमाणे यांच्यासोबत दगा होऊन पिता पुत्रास कैददेखील घडली, तेव्हा राजगड़ी जाऊन दीपाई बांदल यांनी जिजाऊमासाहेबांना धीर दिला व महाराज परत येईपर्यंत राज्गादाव्रच होत्या. असा उल्लेख देखील आपणास मिळतात.

स्वराज्याची पहिली लढाई खळद बेलसर

- इ.स. १६४९ मध्ये स्वराज्याची पहिली लढाई पुरंदर वरून लढली गेली.
- विजापूरचे सैन्य शिवाजी महाराजांचा बंदोबस्त करण्यासाठी पुरंदर कडे निघाले. या सैन्याने खळद बेलसर जवळ छावणी टाकली होती.
- फातेखानाने पुरंदरसाठी नेत लावला होता.



- खानाची छावणी बेलसरनजीक आली. त्याची फौज म्हणजे नुसता पसाराच राजांचे सैन्य ते किती महराजांचा एकूण जमाव तीन हजाराहून अधिक होता. गुंजण मावळचे शिळीमकर देशमुख, मोसे खोऱ्याचे बाजी पासलकर, कारीचे बाजी कान्होजी जेधे, हिरडस मावळचे बाजी बांदल देशमुख , कानद खोऱ्याचे बाबाजी झुंजारराव देशमुख,वेळवंड खोऱ्यातील बाबाजी डोहर देशमुख हे आपल्या जमावानिशी पुरंदरावर उपस्थित होते याशिवाय राजेंभोवती गोदाजीराजे जगताप देशमुख , भिमाजी वाघ, संभाजी काटे, शिवाजी इंगळे, भिकाजी चोर, भैरोजी चोर, कावजी मल्हार यांसारखे तरुण रक्ताचे खंदे वीर गोळा झाले होते .
- या लढाईत बाजी पासलकर यांना वीरमरण आले , बांदल देशमुखांचे २५० जन धारातीर्थी पडले.

जावळीच्या मो-यांवर स्वारी
(इ.स. १६५६)




या युद्धात बांदल सेना व त्यांचे सरनोबत सहभागी होते. याबद्दलचा तपशील तकरीरमध्ये आहे. पण या तपशिलामध्ये काही घटनांबाबत विसंगती आहे.

❖ स्पष्टीकरणासाठी:-

गजानन भास्कर मेहेंदळे लिखित " श्री राजाशिवछत्रपती " भाग २ परिशिष्ट २७

" बांदलांची तकरीर " पृ. क्र. ८८९ ते ८९५ पहावे.

बाजीप्रभू यांना शिवरायांचे पत्र




दि. १३ मे १६५९

सारांश :-

किल्ले जसलोटगड (कासलोटगड) हिरडस मावळ, ओस पडला आहे. त्याचे नाव मोहनगड ठेवावे. गड पुन्हा वसवावा. पिलाजी भोसले यांना हवालदार नेमले आहे आणि २५ लोक दिले आहेत. त्यांना घरे बांधून देऊन त्यांची व्यवस्था लावून मगचा गड उतार व्हावे. असेआदेश दिले आहेत.

प्रतापगडचा रणसंग्राम

दि. १० नोव्हेंबर १६५९




बांदलांचा पराक्रम

ठरलेल्या कराराविरुद्ध सुमारे १५०० ची फौज वाईतून घेऊन अफजलखान प्रतापगड पायथ्याला शिवरायांच्या भेटीस आला. ती फौज महारवाड्याचे टोक या डोंगराच्या पायथ्याला दरीत होते. त्यावर बांदल, जेधे, पासलकर, अनाजीपंत, हिरोजी फर्जंद यांची ७०० ते ८०० ची तुकडी तुटून पडली. त्यात डाव्या बाजूने गुंजण मावळचे शिळीमकर आले. खानाचे फौजेने सपाटून मार खाल्ला. तलवारी, बंदुका भाले वगैरे बरेच साहित्य मराठी फौजेला मिळाले. पुढील १५ दिवसात शिवरायांनी कऱ्हाड सांगली मिरज ते पन्हाळा, विशालगड इथवर प्रदेश जिंकला.



पावनखिंडीचा रणसंग्राम

मार्च २ १६६० ला किल्ल्यास सिद्दी जौहरचा वेढा पडला.





मु.पो. शिंद येथील बाजीप्रभूंचे स्मारक
ता. भोर जि. पुणे. ४१२२०६

- तकरीर मध्ये या युद्धाची माहिती तपशीलवार दिली आहे.

वीर शिवा काशिद



तकरीर मध्ये शिवा काशिद यांच्याबद्दल कोणतीही माहिती नाही.

गजापूरची घोडखिंड "पावन" झाली







बांदल घराण्यातील शूरवीरांच्या समाध्या –
(पिसावारे, ता. भोर, जि. पुणे.)
















ऑगस्ट १६६०

१३ जुलै १६६० रोजी शिवरायांची पन्हाळयाच्या वेढयातून बांदलांनी सुखरुप सुटका केली.
या लढाईनंतर शिवरायांनी बांदलांचे वंशज श्री. रायाजी बांदल यांस मानाचे पहिले तलवारीचे पान दिले तो हा क्षण.



“हनुमंत अंगद जैसे रघुनाथाला जेधे बांदल तैसे शिवाजीला”

पळाला पळाला शाहिस्त्या बोटे टाकून पळाला



११. पुण्यांत शास्ताखानावर हल्ला

पत्रसारसंग्रह भाग ३ रा, नं० २६७२ | श० १५८५ चैत्र, इ० १६६२ एप्रिल

[कोयाजी बांदल यांच्या वंशजांनी इनाम जमिनीचे कागद जपून ठेवले म्हणून शिवाजीच्या शास्ताखानावरील हल्ल्याचें तत्कालीन मराठी वृत्त अचानक हाती आलें.]

......शास्ताखान दिल्लीहून स्वारी करून आले. खासा राजमहालात येऊन राहिले. ते समयी थोरले महाराज जातीनशी रात्रीस धारकरी[1] लोक पायउतारा[2] घेऊन रंगमहालात प्रवेश करून गर्दी केली. ते वेळस कोयाजी बांदल याणे मोगलाचे लोकावर वार केले; त्यासही चार वार लागले. याकरिता महाराज कृपाळू होऊन मौजे आळंदस नूतन इनाम जमीन रकम कास[3] टके[4] १७॥ दिल्हे.

---

१ तरवारबहादर. २ पायी चालत. ३ लागवडीयोग्य जमीन. ४ टका–टक्का. जमिनीचें क्षेत्रमाप.

४८ रुके = १ टक्का
१ टक्का = ४ चाहूर
१२० बिघे = १ चाहूर
} शिवचरित्रसाहित्य खं० २ पृ० १२८ पहा.




सरदार कोयाजी बांदल समाधी
नेकलेस point शेजारी,
भोर,जि. पुणे.

रायाजी नाईक बांदल देशमुख



शिक्रापूरची लढाई



कामावरी ठार झाले ते समई राघोपत व भिकाजी ... आजे ... युद्ध जाले गनीम
मावळ याणी रायाजी नाईक यासिं काढून डेरियासि फुलाजी देशपांडे ता। हिरडस
कित्येक जखमी होते ते आणिले तेव्हां राघोबलाल आणिले व भले लोकही त्याकडील
यासी पुसिलें की रायाजी नाईकास बिल्हे करणे जे त्यावरून अत्रे यानी भिकाजी फुलाजी
येथे करता नये वतनावर न्यावे लागतात त्यावरून त्यांनी उत्तर केले जे
मग जाल्या युद्धाची आखरे माहाराज राजेश्री साहेब (१०) राघोपंती त्याची रवानगी केली
आस्ता हुजूर पाठविली तेव्हां वर्तमान विदित जाले मागे चंदीचे मसलतीस
लाविले त्याची खंती दिपाई आऊ याणी धरली यास्तव साहा महिनियानी रायाजी नाईक यासी निल्हे
प्राप्त झाली तेव्हां दिपाई आऊ धणी आपले स्वमुखे वाटणी केली याची नकल फार वेथा
तपसील बी

श्री शके १६०० कालयुक्ताक्षी संवत्सरे आषाढ मास शुध ५ पंचमी शनवार
ते दिवसी राजश्री दिपाई आवा देशमूख ता। हिरडस मावळ सुहूर सन तिसा सबैन
अलफ ते दिवशी आपल्या मुखे बोलली जे आपल्या नातसुना तिघी यासीं वाटून
दिल्हे बी तपसील

राजश्री संकाजी नाईक
१ सिका
२ इसापती :--
१ महुडे बु॥
१ निगुडघर
२
१ शेतमळा मौजे आळंदे ता। मजकूर

राजश्री मानसिंग नाईक
२ इसापती :--
१ पिसवड
१ पऱ्हर खुर्द
२

राजश्री चांदाजी नाईक
२ इसापती
१ भोलावले
१ भाणसदरे
२
१ पाटीलकी मौजे इंगवली
३

येणे प्रों करून दिल्हे आहे या बरहुकूम चालावे मुलकातून हकपैकी सिकियाची
खर्च काढून उरल ते बरहक वाटून घ्यावे हा कागद सही


छत्रपती शिवराय दक्षिण मोहिमेवर जाताना रायाजी बांदल देशमुख त्यांच्या सोबत विजापूरपर्यंत होते.त्यांना महाराजांनी परत पाठवले. नंतर इकडे पुण्याकडे मोघलांनी गाधाडी तळेगाव(बहुतेक आताचे तळेगाव दाभाडे) घेतले. ते परत जिंकून घेण्यासाठी राघो बल्लाळ याने स्वारी केली, तेव्हा रायाजी बांदल देशमुख हे आपल्या सैन्यासह(फुलाजी प्रभूंचे पुत्र भिकाजीप्रभू हेही सोबत होते) राघो बल्लाळ यांस सामील झाले. या युद्धात रायाजी बांदल धारातीर्थी पडले.
त्यानंतर दीपाऊ बांदल औसाहेब यांनी आपल्या पणतवांमध्ये वाटणी केली. १५ जून १६७८-७९

रायाजी बांदल यांचे पुत्र
शंकराजी
मानसिंग
चांदाजी
बाजी
संताजी

या ५ पुत्रांपैकी ३ जेष्ठ पुत्रांमध्ये वाटणी :-
१) शंकराजीस नाईक :- देशमुखी शिक्का, पूर्ण महुडे बु.|| निघुडगर १/२ हिस्सा व आळन्दे येथील एक शेतमळा.
२) मानसिंग नाईक :- पूर्ण पिसवड (आताचे पिसावरे), १/२ प-हर खुर्द
३) चांदजी/ चांदाजी नाईक :- पूर्ण भोलावले (आताचे भोलावडे). १/२ भाणसदरे व १/३ पाटीलकी मौजे इंगवली

तसेच प्रत्येक वाटणीतील खर्च काढून बाकीचे उत्पन्न वाटून घ्यावे. अशी वाटणी झाली.

हजीर मजालस



१ राजश्री रावजी उपाध्ये.
१ राजश्री पंतप्रधान यांकडील भिकाजी
परभू.
१ राजश्री दौलतराव शिर्के.
१ राजश्री पंतसचीव यांकडील राजश्री
बाजी बाबजी.
गोत महालानिहाय हजीर.
३ सुभानजी नाईक बांदल देशमुख तर्फ हिरडस मावळ.१
बापुजी नाईक व .
धनाजी नाईक कोंडे
देशमुख तर्फ खेडे-
बारें.
संताजी बिन कान्होजीराव पासलकर देशमुख तर्फ मोसें खोरें.१

१ राजश्री नारोराम मंत्री.
१ राजश्री भास्कर वैद्य.
१ राजश्री यशवंतराव महादेव कारकून
दिंमत मशारनिल्हे.
३
१ राजश्री रामाजी दामोदर दिवाण.
१ राजश्री पांडुरंग खंडेराव.
१ राजश्री नारोराव शामराज फडणीस.
३
१ हजीर मज्यालशी समस्त.

शेजारी दिलेल्या हाजीर मजालस (निवाड्यास हजर असलेल्या उपस्थितांची

यादी) मध्ये शाहूछत्रपती (सातारा गादी) कालीन

१. सुभानजी नाईक बांदल देशमुख तर्फ हिरडस मावळयांचा उल्लेख सापडतो.

तसेच इतर खो-यातील देशमुखांचा व इतर अधिका-यांचा उल्लेख यामध्ये आढळतो.

❖ संदर्भ

१. शिवभारत

२. बांदलांची तकरीर
ऐतिहासिक संकीर्ण निबंध, खंड १०, पृ. ६ ते १०.

३. मराठ्यांच्या इतिहासाची साधने
खंड १७, क्र. १० (पृ.१८)

४. श्री राजा शिवछत्रपती भाग - २
लेखक - गजानन भास्कर मेहेंदळे

५. स्वराज्याची प्रभात
लेखक - पुरुषोत्तम वामन गोवईकर

६. राजा शिवछत्रपति
लेखक - बळवंतराव मोरेश्वरराव पुरंदरे

❖ अजूनही बांदल घराण्याच्या इतिहास संशोधनास वाव आहे. भविष्यात नव्याने पुरावादाखल उजेडात येणाऱ्या अस्सल कागदपत्रांचा निश्चितच यासाठी उपयोग होईल.

आमच्याशी येथे संपर्क साधण्यासाठी खालील
Links वर click करा

@historic_bhor

Bhor History

जय शिवराय

धन्यवाद...!!